# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in


क्रमांक :- २/एनजीसी/प्रवेशक्षमता वाढ/घट/२०१२/ २०७५/श्र
दिनांक : 15 DEC 2012

प्रति
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, नाशिक, पुणे, औरंगाबाद,
अमरावती व नागपूर.

**विषय:- शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून सध्या सुरु असलेल्या पदवी व पदव्युत्तर पदवी संस्थेमध्ये नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यास तसेच सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत वाढ/घट करण्याच्या प्रस्तावाबाबत.**

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद नवी दिल्ली यांनी सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षाकरीता प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेद्वारे [Advt.No.:Approval/09/(3)/2012] परिषदेच्या ॲप्रुव्हल प्रोसेस हॅण्डबुक मधील मार्गदर्शक सूचनेच्या आधारे ऑन-लाईन पध्दतीने अर्ज दि. ३०/०९/२०१२ ते दि. ३१/१२/२०१२ पर्यन्त मागविण्यात आलेले आहेत. त्यानुसार पदवी, पदव्युत्तर पदवी, पदविकोत्तर / पदव्युत्तर पदविका या व्यावसायिक अभ्यासक्रमासंदर्भात संस्थाना परिषदेस केलेल्या अर्जावर शासनाचे अभिप्राय / शिफारस परिषदेस सादर करण्याच्या अनुषंगाने या संचालनालयाच्या संकेतस्थळावर ऑन-लाईन माहिती भरण्याकरीता www.dte.org.in/courseapproval2013 ही लिंक दि. ०६.१२.२०१२ पासून उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यानुसार संस्था त्यांच्या अर्जाची फक्त माहिती भरत असून भरलेली माहिती निश्चित **(confirm)** करत नसल्याने संचालनालयास पुढील कार्यवाही करता येत नाही. **म्हणून आपल्या विभागाच्या कार्यकक्षेतील सर्व संबंधित संस्थाना त्यांच्या अर्जाची माहिती उपरोक्त लिंक वर ऑन लाईन पध्दतीने भरून निश्चित (confirm) करण्यासाठी आपल्या स्तरावरुन सूचना देऊन त्याचा कार्यपालन अहवाल उलट टपाली सादर करावा. तसेच ज्या ज्या संस्था त्यांचा अर्ज निश्चित (confirm) करणार नाहीत अशा संस्थांच्या अर्जाबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही याबाबत त्यांना कळविण्यात यावी.**

तसेच येथे नमूद करण्यात येते की, राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थांनी परिषदेस सादर केलेल्या अर्जास अनुसरून शासनाचे अभिप्राय परिषदेस सादर करण्यासाठी दि. २७.१२.२०१२ रोजी सुनावणी घेण्यात येणार आहे. म्हणून ज्या संस्था त्यांच्या अर्जाची वरील लिंकवर भरलेली माहिती दि. २१.१२.२०१२ पर्यंत **निश्चित (Confirm) करतील त्यांची सुनावणी घेण्याचे नियोजित आहे. सदर सुनावणी घेण्यात येणा-या संस्थाची यादी दि. २१.१२.२०१२ रोजी ई-मेल द्वारे आपणांस पाठविण्यात येईल व यापुढील सुनावणी होणा-या संस्थाची यादी वेळोवेळी पाठविण्यात येईल.** सुनावणीपुर्वी खालील प्रमाणे कार्यवाही करणे बंधनकारक असून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यास आपल्या स्तरावरुन सर्व संस्थांना सूचित करण्यात यावे.




नागपूर
आवक क्रमांक 1190/
18 DEC 2012

❖ शासन निर्णय, क्र.सीटीसी-२०११/(प्र.क्र.४२/११)/तांशि-४, दि.२४ जानेवारी, २०१२ अन्वये विहित केल्यानुसार नोंदणी शुल्क संबंधित संस्थाना सुनावणीस येण्यापुर्वी आपल्या कार्यालयाकडे भरण्यास सूचित करण्यात यावे. ज्या संस्था सदर शुल्क सुनावणी पुर्वी अदा करणार नाहीत त्यांची सुनावणी घेण्यात येणार नाही याबाबतची माहिती त्यांना देण्यात यावी.

❖ पीआयओ/ एनआरआयच्या जागा व त्यांची मुदतवाढ, प्रवेश क्षमता कमी करणे, संस्थेचे स्थलांतर, पदव्युत्तर पदवी / पदविका, पदविकोत्तर पदविका अभ्यासक्रमाच्या मंजूर क्षमतेत वाढ, डयुअल पदवी / इंडीग्रेटेड कोर्सेस, परदेशी संस्था / विद्यापीठ संलग्नता या प्रस्तावासाठी दि. २४.०१.२०१२ च्या शासन निर्णयात नोदणी तथा तपासणी शुल्काचा समावेश नाही. सदर अभ्यासक्रमास आकारवयाच्या शुल्क शासनास प्रस्तावित केले असून अद्याप शासन आदेश निर्गमित झालेले नाहीत. मात्र प्रस्तुत प्रस्तावावर कार्यवाही कालमर्यादेत करावयाची असल्याने सदर प्रस्तावाबाबत खालील प्रमाणे नोंदणी / तपासणी शुल्क शासन मान्यतेच्या अधिन राहून आकारण्यात यावे.

| अ.क्र. | प्रस्तावाचे स्वरुप | ज्या ठिकाणी प्रत्यक्ष अभ्यासक्रम सुरू आहेत किंवा सुरू करण्यात येणार आहेत त्या ठिकाणासाठी विहित केलेली नोंदणी शुल्कांची रक्कम | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | मुंबई, ठाणे, नवी मुंबई | पुणे, नागपूर, औरंगाबाद, पिंपरी — चिंचवड, महा-नगरपालिका क्षेत्र | उर्वरीत महानगर पालीका | इतर |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | पीआयओ/ एनआरआयच्या जागा व त्यांच्या मुदतवाढीबाबत.... | रु. १,३५,०००/- | रु ९०,०००/- | रु.६७,५००/ | रु. ४५,०००/- |
| २ | संस्थेचे स्थलांतर | रु. ७५,०००/- | रु. ६०,०००/- | रु. ४५,०००/- | रु. ३७,५००/- |
| ३ | पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका, पदविकोत्तर पदविका अभ्यासक्रमाच्या मंजूर क्षमतेत वाढ | रु. ७५,०००/- | रु. ६०,०००/- | रु. ४५,०००/- | रु. ३७,५००/- |
| ४ | डयुअल पदवी / इंटीग्रेटेड कोर्सेस | रु. ७५,०००/- | रु. ६०,०००/- | रु. ४५,०००/- | रु. ३७,५००/- |
| ५ | परदेशी संस्था / विद्यापीठ संलग्नता | रु. ४,५०,०००/- | रु. ३,००,०००/- | रु. २,२५,०००/ | रु. १,५०,०००/- |

❖ ॲप्रुव्हल प्रोसेस हॅण्डबुकमधील तरतुदीनुसार राज्यात सुरु असलेल्या व्यावसायीक अभ्यासक्रमाच्या संस्थाकडून खालील प्रस्ताव अपेक्षित आहेत.

१. सुरु असलेल्या संस्थेत प्रवेश क्षमतेत वाढ, अतिरिक्त अभ्यासक्रम (प्रथम व दुसरी पाळी)
२. सुरु असलेल्या संस्थेत सेकंड शिफटमध्ये पार्ट टाईम कार्यक्रम.
३. पीआयओ जागा व त्यांची मुदतवाढ
४. एनआरआयच्या जागा व त्यांची मुदतवाढ
५. अतिरीक्त डयुअल डिग्री / इंटीग्रेटेड प्रोग्राम.
६. परदेशी संस्था / विद्यापीठ संलग्नता

उपरोक्त नमुद केलेल प्रस्तावास अनुसरून येथे असे स्पष्ट करण्यांत येते की, संस्थेने वरील प्रस्तावासाठी अर्ज सादर केले असल्यास प्रत्येक प्रस्तावासाठी स्वतंत्रपणे विहित नोंदणी/तपासणी शुल्क आकारण्यांत यावेत.

❖ ज्या संस्था तपासणी शुल्क भरणार नाहीत, अशा संस्थांची तपासणी केली जाणार नाही व संबंधित संस्थांच्या प्रस्तावावर शासनामार्फत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडे शिफारस केली जाणार नाही व त्यास संबंधित संस्था/ट्रस्ट सर्वस्वी जबाबदार राहतील. याबाबत संबंधितांना आपल्यास्तरावर जाणीव करुन देण्यात यावी.

❖ संबंधीत संस्थेने सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरुन जागा, इमारत, बांधकाम, निधी, यंत्रसामुग्री व इतर सोयी-सुविधा अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने शैक्षणिक वर्ष २०१३-१४ करीता ॲप्रुअल प्रोसेसहँडबुकमध्ये विहित केलेल्या मानकानुसार उपलब्ध आहेत किंवा कसे? याबाबतची माहिती या संचालनालय स्तरावर आयोजित उपरोक्त सुनावणीच्या वेळी संबंधित संस्थेचे अध्यक्ष, सचिव किंवा प्राचार्य तसेच माहितीगार व्यक्तीसह उपस्थित रहावे. सुनावणीच्या वेळी संस्थेने नोंदणीशुल्क भरल्याबाबतची पुराव्याखातर पावतीची मुळ प्रत, प्राचार्य/ संचालक यांच्या नियुक्ती व त्यांच्या शैक्षणिक पात्रतेसंबंधीची माहिती, संस्थेतील सध्याची प्रवेशक्षमता, मंजूर व भरलेल्या शिक्षकांची संख्या, जागा, बांधकामाची सध्यस्थिती, ॲडमिनिस्ट्रेटिव्ह, ॲमेनिटीज, इन्स्ट्रक्शनल व सर्क्युलेशन एरिया याबाबतची माहिती, कॉम्प्युटेशनल फॅसिलीटी, लायब्ररी फॅसिलीटी, ई जर्नल्स आणि इतर आवश्यक सोयी-सुविधांबाबतच्या माहिती व त्याअनुषंगाने आवश्यक कागदपत्रांसह तपासणीकरिता या संचालनालयात आणणे आवश्यक आहे. याबाबतचे निर्देश आपल्यामार्फत संबंधित संस्थांना देण्यात यावेत.

❖ संस्था/अभ्यासक्रम बंद करणे तसेच मंजूर असलेल्या प्रवेश क्षमतेत घट करणे या संदर्भात परिषदेने आवश्यक केलेल्या प्रमाणपत्रासह संस्थेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या समावेशनाबाबत तसेच भविष्यात न्यायालयीन प्रकरण उद्‌भवल्यास त्यास संस्था सर्वस्वी जबाबदार राहील, या आशयाचे रु.१००/- चे नोंदणीकृत लेखी हमीपत्र सादर करणे आवश्यक राहिल.

❖ या संचालनालयाने ऑन लाईन माहिती भरण्यासाठी दि. ०६.१२.२०१२ पासून लिंक उपलब्ध करुन दिलेली आहे. तद्‌नंतर दि. १२.१२.२०१२ रोजी ॲनेक्चर डी हे स्वतंत्र प्रपत्र दिलेल्या लिंक वर उपलब्ध करुन दिलेले आहे. म्हणून दि. ०६.०६.२०१२ ते दि. १२.१२.२०१२ या दरम्यानच्या

कालावधीत ज्या संस्थांनी माहिती भरली असेल अशा संस्थांना ॲनक्चर डी बाबतची माहिती पुनश्च भरण्यासाठी कळविण्यात यावे.

- शैक्षणिक वर्ष २०१३-१४ करीता प्रसिध्द केलेल्या ॲप्रुवल प्रोसेस हॅण्डबुक मध्ये नमूद केलेली ॲपेडीक्स १७ व १८ मधील व केलेल्या अर्जास अनुसरुन आवश्यक असलेली कागदपत्रे / दस्तऐवज / प्रमाणपत्रे. अद्ययावत डिफिशिएन्सी रिपोर्ट, परिषदेस सादर केलेल्या अर्जाची पार्ट - १ व २, नोंदणी शुल्क भरलेल्या पावती, ॲनेक्चर सी व ॲनेक्चर डी इत्यादींच्या प्राचार्यांनी प्रमाणित केलेल्या प्रतीसह प्रस्ताव सुनावणीच्या वेळी संचालनालयास सादर करावा.

येथे असे नमूद करण्यात येते की, संस्थेने अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडे सादर केलेल्या प्रस्तावानुसार अभ्यासक्रम इत्यादी व अभ्यासक्रमाचया मागणीचा क्रम बरोबर आहे किंवा कसे? याबाबत संस्थेने खात्री करुन घ्यावी व त्यात काही बदल असल्यास तसे सुनावणीच्या वेळी निदर्शनास आणावे.त्याचप्रमाणे संस्थेने परिषदेकडे सादर केलेल्या अर्जाची प्रत व सदर प्रस्तावास अनुसरुन त्यासंबंधीचा अद्ययावत डिफिशिएन्सी रिपोर्ट व वरील मुद्यात नमूद केलेल्या कागदपत्रांच्या मुळ प्रती सोबत आणण्याबाबत आपल्यास्तरावर सूचित करण्यात यावे.

तसेच या कार्यालयास या पुढे प्राप्त होणा-या प्रस्तावाबाबत वेळोवेळी कळविण्यात येईल. तसेच नोदणी शुल्क भरल्याची पावती व मुळ दस्ताऐवज निर्धारित वेळापत्रकानुसार संस्थेने सादर न केल्यास अशा संस्थांना वाढीव वेळ दिला जाणार नाही. याची कल्पना संबंधित संस्थांना आपल्या स्तरावर देण्यात यावी.

( डॉ.सुभाष महाजन )
प्र.संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई.